सकाळ : पुणे
मंगळवार, ३० नोव्हेंबर २०१०

MONEY TODAY



# खड्डेमुक्त रस्त्यांसाठी नवे तंत्रज्ञान

## टेक्फॅब इंडिया कंपनीकडून पुढाकार; केडगावजवळील दोन रस्त्यांवर वापर

**पुणे, ता. २९ :** पावसामुळे रस्त्यांवर वारंवार पडणाऱ्या खड्ड्यांना प्रतिबंध घालणारे नवीन तंत्र टेक्फॅब इंडिया कंपनीने विकसित केले आहे. यासाठी त्यांनी 'पॉली प्रॉपिलिन जिओटेक्स्टाईल' हे नवीन तंत्र विकसित केले आहे. याचा वापर केल्यास रस्त्याचे आयुष्य पाच ते सहा वर्षांनी वाढू शकते. परिणामी रस्ते खड्डेमुक्त होऊ शकतात, असा दावा कंपनीच्या वतीने करण्यात आला आहे.

या 'भूवस्त्राच्या' निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा रिलायन्सतर्फे केला जात असल्याची माहिती टेक्फॅब कंपनीचे व्यवस्थापक जयेंद्र रणदिवे आणि रिलायन्स पेट्रोकेमिकल विभागाच्या पुणे पॉलिमर ग्रुपचे प्रमुख सत्यजित भोसले आणि व्यवस्थापिका प्रियांका आपटे यांनी दिली.

या तंत्राचा वापर २००४ मध्ये पुणे जिल्ह्यातील केडगाव (ता. दौंड) जवळील दौंड-गार दापोडी या रस्त्यावर सर्वप्रथम करण्यात आला होता. तेव्हापासून आजतागायत त्या रस्त्यावर खड्डा पडला नसल्याचा दावाही कंपनीच्या वतीने करण्यात आला आहे. त्यानंतर आता याच तंत्राचा वापर हा दौंड शुगर फॅक्टरीसमोरून जाणाऱ्या लिंगाळी-बोरिबेल या रस्त्याच्या कामासाठी केला जात आहे. हे जिओटेक्सटाईल रस्त्यावर अंथरूण त्यावर मुरूम व खडी टाकण्यात येते. त्यामुळे पावसाचे पाणी झिरपून जाते. पर्यायाने जमीन फुगत नाही व खड्डा पडत नाही, असे रणदिवे यांनी सांगितले.

जिल्हा परिषदेतील काँग्रेसचे गटनेते व जिल्हा परिषद सदस्य वीरधवल जगदाळे यांच्या हस्ते या तंत्रज्ञानाचा वापर लिंगाळी-गार दापोडी रस्त्यावर करण्यात आला. या वेळी रिलायन्स कंपनीचे व्ही. कानन, मुंबई टेक्सटाईल रिसर्चचे व्ही. के. पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता सुरेंद्रकुमार काटकर उपस्थित होते.